अनुकंपा तत्वावर कंत्राटी ग्रामपंचायत अधिकारी
गट-क या पदावर नियुक्ती देण्याबाबत

जिल्हा परिषद अहिल्यानगर
सामान्य प्रशासन विभाग
जिल्हा परिषद आदेश क्र.साप्रवि-२/ग्रांप-१/३५५/२०२५
दिनांक: २५/०९/२०२५

संदर्भ-१) म.जि.प. जिल्हा सेवा (सेवाप्रवेश) नियम १९६७ मधील परिशिष्ट ८ (३)
२) महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग मंत्रालय मुंबई शासन अधिसुचना दि.२५.०८.२०११
३) ग्रामविकास विभागाकडील शासन निर्णय क्रं.संकीर्ण-२०२३/प्र.क्रं.८६/ आस्था-७ दि.१८ जुलै २०२३.
४) महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग यांचेकडील शासन निर्णय क्र. अकंपा-१२२५/प्र.क्र.१२१/म.लो.आ.,दि.१७/०७/२०२५
५) महाराष्ट्र शासन ग्रामविकास विभागाकडील शासन निर्णय क्र. अकंपा-२०२५/प्र.क्र.४४२/आस्था ७,दि.३१/०७/२०२५
६) सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद अहिल्यानगर यांचेकडील अनुकंपा नियुक्ती संदर्भातील दि.१२/०९/२०२५ रोजीचे मंजुर इतिवृत

कै.संजय बाबाजी वामन हे जि.प.प्रा.शाळा कोल्हे टेक वस्ती, निमगावघाना, ता. अहिल्यानगर येथे प्राथमिक शिक्षक गट क या पदावर जिल्हा परिषद सेवेत कार्यरत असतांना त्यांचे दि.१४/०९/२०२४ रोजी निधन झाल्याने त्यांचे पात्र वारसदार श्री. ओम संजय वामन यांनी स्वतःस अनुकंपा तत्वावर नियुक्ती मिळणेबाबत अर्ज या कार्यालयास सादर केला आहे. त्यानूसार सदर अनुकंपा प्रकरणाची संदर्भीय शासन निर्णयामधील निर्देशांच्या अधीन राहुन छाननी व पडताळणी केलेली आहे. तसेच प्रचलित शासन निर्णयातील तरतुदीनुसार खालीलप्रमाणे नियुक्ती देण्यात येत आहे.

श्री.ओम संजय वामन हे संदर्भ क्रं.१ मधील तरतूदीनुसार व संदर्भ क्रं.२ नुसार कंत्राटी ग्रामपंचायत अधिकारी वर्ग-३ या पदासाठी आवश्यक शैक्षणिक अर्हता धारण करीत असलेने कंत्राटी ग्रामपंचायत अधिकारी वर्ग-३ या पदावर नेमणुकीसाठी पात्र आहेत. त्यानुसार मला प्रदान असलेल्या अधिकाराचा वापर करुन याद्वारे मी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद अहिल्यानगर श्री.ओम संजय वामन यांना खालील विहित अटी व शर्तीवर जिल्हा सेवेतील कंत्राटी ग्रामपंचायत अधिकारी वर्ग-३ या सरळसेवेच्या पदावर अनुकंपा तत्वावर रकाना क्रं.५ मध्ये नमुद ठिकाणी संदर्भ क्रं.६ चे मंजुर इतिवृतानुसार समुपदेशनाने पदस्थापना देत आहे. सदर अटी व शर्ती मान्य असल्याबाबत विहित नमुन्यातील हमीपत्र, जामीनपत्र त्यांनी हजर होतांना कार्यालय प्रमुखांना लिहुन देणे बंधनकारक राहिल.

| अ.क्र. | अनुकंपा तत्वावर नियुक्त केलेल्या अर्जदाराचे नाव व पत्ता | जातीचा प्रवर्ग | निवडीचा प्रवर्ग | पदस्थापनेचे ठिकाण |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | श्री.ओम संजय वामन, रा. आठरे पाटील शाळेच्या पाठीमागे,वडगाव गुप्ता रोड, मुकबधीर शाळे शेजारी, ता.जि. अहिल्यानगर, पिन ४१४००३ | इ.मा.व. | इ.मा.व. | पंचायत समिति अहिल्यानगर |

**नेमणुकीच्या अटी व शर्ती**

१. सदरची नियुक्ती निव्वळ तात्पुरत्या स्वरुपातील आहे. अर्जदाराने अनुकंपा प्रकरणी सादर केलेले कागदपत्र बनावट अथवा खोटी असल्याचे भविष्यात निदर्शनास आल्यास,सदरची नियुक्ती तात्काळ रद्द करण्यात येईल.

२. सदर नियुक्ती संदर्भात भविष्यात कोणत्याही प्रकारचा वाद अथवा न्यायालयीन वाद उदभवल्यास सदरची नियुक्ती तात्काळ रद्द करण्यात येईल.

३. आदेश मिळाल्याच्या दिनांकापासुन २१ दिवसांत पदस्थापना दिलेल्या ठिकाणी हजर न झाल्यास आपली निवड रद्द झाली आहे असे समजुन नाव निवड यादीतुन कमी करणेत येईल.

४. हजर होताना सक्षम प्राधिकाऱ्याकडे अहिल्यानगर जिल्हा शल्य चिकित्सक यांचेकडील वैद्यकियदृष्टया सक्षम असल्याचे प्रमाणपत्र सादर करावे लागेल.

५. नेमणुकीच्या ठिकाणी हजर होण्याकरिता कोणत्याही प्रकारचा भत्ता दिला जाणार नाही.

६. संदर्भ क्रं.३ अन्वयेचे शासन निर्णयातील तरतुदीनुसार आपणास दरमहा रुपये १६०००/- एकत्रित वेतन तसेच नियमित ग्रामपंचायत अधिकाऱ्याप्रमाणे कायम प्रवास भत्ता देण्यात येईल. या खेरीज इतर कोणतेही वित्तीय लाभ आपणास अनुज्ञेय असणार नाही. सार्वजनिक सुट्ट्या व दोन महिन्याच्या सेवेसाठी एक नैमित्तिक रजा किंवा एक कॅलेंडर वर्षात ६ नैमित्तिक रजा अनुज्ञेय राहतील. तसेच महिला कर्मचा-यास प्रचलित नियमानुसार प्रसुती रजा अनुज्ञेय राहिल. प्रत्येक महिन्यातील सार्वजनिक सुट्ट्या व्यतिरिक्त, नैमित्तिक रजा व प्रसुती रजा व्यतिरिक्त अनुपस्थित असेल तेवढी रक्कम आपले महिन्याचे मानधनातुन कापून घेण्यात येईल.

७. नियुक्तीपूर्वी आपणास सुरक्षा ठेव म्हणून रु.१०,०००/- एवढी रक्कम नियुक्ती प्राधिका-याकडे भरावी लागेल व दोन प्रतिष्ठित व्यक्तीचे जामिनपत्र लिहुन द्यावे लागेल.

८. कंत्राटी ग्रामपंचायत अधिकारी म्हणून आपणास ज्या ग्रामपंचायतीचा कार्यभार सोपविला आहे, त्या ग्रामपंचायतींचा कार्यभार आपणास सांभाळावा लागेल.

९. नियुक्ती कालावधीत आपण कोणत्याही स्वरुपाची गैरवर्तणूक केल्यास आपली नियुक्ती रद्द करण्यात येईल. त्यासाठी नियुक्ती पत्रातील कालावधी बंधनकारक नाही. तथापि आपली नियुक्ती रद्द करण्याविरुध्द आपणास विभागीय आयुक्त यांचेकडे अपिल करता येईल.चौकशीत आर्थिक गैरव्यवहार आढळून आल्यास जिल्हा परिषदेच्या आर्थिक नुकसानीएवढी रक्कम आपण दिलेल्या सुरक्षा ठेवीमधून वसूल करण्यात येईल आणि त्यापेक्षा गैरव्यवहाराची रक्कम अधिक असल्यास जामिनदाराकडून वसूल करण्यात येईल.

१०. नियमित स्वरुपाची नियुक्ती केलेल्या ग्रामपंचायत अधिकाऱ्याच्या किंवा जिल्हा परिषदेच्या कर्मचा-यांच्या सेवा सुविधा आपणास अनुज्ञेय असणार नाही.

११. आपणास कंत्राटी ग्रामपंचायत अधिकारी म्हणून हमी पत्रातून मुक्त व्हावयाचे असल्यास (राजीनामा द्यावयाचा झाल्यास) आपण आपल्या गट विकास अधिकाऱ्यामार्फत किमान एक महिन्याची पुर्वसूचना आपले नियुक्ती प्राधिकाऱ्यास देणे अथवा एक महिन्याचे मानधनाची रक्कम नियुक्ती प्राधिकाऱ्याकडे जमा करणे आवश्यक आहे. आपण विहित मुदतीत तशी पूर्वसूचना न दिल्यास अथवा मानधनाची रक्कम जमा न केल्यास आपणास पुन्हा भविष्यात ग्रामपंचायत अधिकारी म्हणून नियुक्ती देण्यात येणार नाही.

१२. आपली कंत्राटी ग्रामपंचायत अधिकारी म्हणून नियुक्ती पंचायत समिती कार्यालयास हजर झाल्याच्या दिनांकापासुन ३ वर्षाच्या कालावधीसाठी राहील. ३ वर्षाचा कालावधी संपल्यानंतर कंत्राटी ग्रामपंचायत अधिकारी म्हणुन आपली नियुक्ती आपोआप संपुष्टात येईल. त्यासाठी आपणास कोणत्याही प्रकारची वेगळी सुचना दिली जाणार नाही व आपले कामकाज समाधानकारक आढळून आल्यास व जिल्हा परिषदेत रिक्त पद उपलब्ध असल्यास आपली नियमित वेतनश्रेणीतील ग्रामपंचायत अधिकारी पदावर नियुक्ती करण्यात येईल. नियुक्ती न

मिळाल्यास त्याबाबत आपणास विभागीय आयुक्त यांचेकडे अपील करता यईल. त्यासाठी आपणास कोणत्याही प्रकारची वेगळी सुचना दिली जाणार नाही.

१३. अनुकंपा धारकाने सादर केलेल्या प्रतिज्ञापत्राचे आधारे व गट विकास अधिकारी यांचेकडील प्राथमिक चौकशीचे आधारे सदर नेमणुक देण्यात आली आहे. भविष्यात सदर प्रतिज्ञापत्रामध्ये गैरप्रकार केलेचे आढळल्यास अथवा मयत कर्मचारी यांचे कुटुंबातील इतर वारस यांचा सांभाळ न केल्यास अथवा वारसाची तक्रार अथवा हरकत प्राप्त झाल्यास सदरील अनुकंपा नियुक्ती समाप्त करणेत येईल याची नोदं घ्यावी.

१४. सदरची नियुक्ती चांगले चारित्र्य व यापूर्वी असणा-या सेवेत कोणत्याही प्रकारचा ठपका असता कामा नये या अटीवर करण्यात आलेली आहे. या मध्ये एखादी गंभीर बाब निदर्शनास आल्यास कोणतेही कारण न देता सेवा समाप्त करण्यात येईल.

१५. विवाहित असल्यास तुम्हाला एकच पती/पत्नी आहे असे गृहित धरुन नियुक्ती देण्यात येत आहे. एक पेक्षा जास्त पती/पत्नी असल्याचे निदर्शनास आल्यास तुमची सेवा समाप्त करण्यात येईल.

१६. नेमणूकीनंतर सेवापुस्तकात केलेली जन्मतारखेची नोंद पाच वर्षानंतर बदलता येणार नाही.

१७. महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग परिपत्रक क्रएसआरव्ही-२०००/प्र.क्र.१७/२०००/१२ दिनांक १/७/२००५ अन्वये दोन पेक्षा अधिक मुले असणा-या उमेदवारांना शासन सेवेत नियुक्ती देण्यात प्रतिबंध करण्यासाठी महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटंब प्रतिज्ञापत्र) नियम २००५ नियुक्त्यासाठी अधिसूचनेत विहीत केलेली लहान कुटंबाची अतिरिक्त अट लागु झालेली आहे. त्या अनुषंगाने सदर नियमातील प्रतिज्ञापत्र नमुना अ नुसार उमदेवाराकडुन प्रतिज्ञापत्र कार्यालय प्रमुखाने भरुन घ्यावे. सदर नियमानुसार दिनांक २८/०३/२००५ नंतर तिसरे अपत्य असणा-या उमेदवाराची नियुक्त रद्द करण्यात येईल.

१८. शासन पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांच्याकडील शासन निर्णय क्र.घभाम/१००५/प्र.क्र.४६३/पापु १६ दिनांक ८ जुन २००६ अन्वये शासकीय कर्मचारी व अधिकारी यांना शौचालयाचा वापर करणे अनिवार्य करणेत आलेले आहे. त्यानुसार कार्यालय प्रमुख यांनी उमेदवाराकडुन शौचालय असले बाबत व त्याचा वापर करीत असलेबाबत प्रमाणपत्र एक महिन्याचे आत घ्यावे. ज्याचेकडे शौचालयाची सुविधा नाही अथवा जे उमेदवार शौचालयाचा वापर करीत नाही त्यांचा घरभाडे भत्ता थांबविण्यात येईल.

१९. सदर कर्मचारी यांचे मुळ सेवा पुस्तक भरतांना खालील कागदपत्रे डकविण्यात यावीत. ती डकविण्यात आलेली आहेत किंवा नाही? या बाबतची खात्री स्वत: करुन घ्यावी.

१.शारिरीकदृष्टया पात्र असल्याचे वैद्यकिय प्रमाणपत्र, २.मागासवर्गीय असल्यास जातीचा दाखला, ३.स्वग्राम घोषणा पत्र व ४.शैक्षणिक अर्हता.

२०. अनुकंपा नियुक्ती दिल्यानंतर तालुका बदलुन मिळण्यासाठी कोणत्याही प्रकारे पत्रव्यवहार केल्यास तुम्हास कोणतेही कारण न देता केलेली नियुक्ती रद्द करण्यात येईल.

२१. मागासवर्गीय उमेदवाराचे बाबतीत शासन निर्णय दि.१२ डिसेंबर २०११ नुसार आपणास सहा महिन्याच्या आत जात पडताळणी समितीकडुन जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहिल अन्यथा आपली नियुक्ती रदद् केली जाईल.

२२. वित्त विभागाकडील शासन निर्णय क्रं.अनियो-१००५/१२६/सेवा-४ दि.३१.१०.२००५ अन्वये दि.१.११.२००५ रोजी किंवा त्यानंतर ज्या उमेदवारांची शासकीय सेवेत नियुक्ती होईल,त्यांचा नवीन परिभाषित अंशदान निवृती वेतन योजना लागु ठरेल. मात्र सध्या अस्तित्वात असलेली निवृती योजना म्हणजे महाराष्ट्र नागरी सेवा (निवृती वेतन) नियम १९८२ व महाराष्ट्र नागरी सेवा (निवृती वेतनाचे अंशराशीकरण) नियम १९८४ आणि सध्या अस्तित्वात असलेली सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी योजना लागु होणार नाही.

२३. तुम्हास जिल्हा परिषद सेवेत नियमित झालेनंतर,जिल्हा परिषद सेवा प्रवेशोत्तर परिक्षा तीन संधीमध्ये चार वर्षात उत्तीर्ण होणे आवश्यक आहे.

२४. महाराष्ट्र शासन,वित्त विभागाकडील शासन निर्णय क्रं.रानियो-२०२२/प्र.क्रं.३४/सेवा-४ दिनांक ३१.०३.२०२३ अन्वये परिभाषित अंशदान निवृतीयोजना/राष्ट्रीय निवृतीवेतन प्रणाली अंतर्गत कर्मचा-याचा सेवा कालावधीत मृत्यु झाल्यास, त्याच्या कुटुंबियांना कुटुंब निवृतीवेतन आणि मृत्यु उपदान व रुग्णता सेवानिवृत झालेल्या कर्मचा-यांला रुग्णता निवृतीवेतन आणि सेवानिवृती उपदान तसेच शासन सेवेतुन निवृत होणा-या कर्मचा-यांना सेवानिवृती उपदान लागु होईल. त्याकरिता आपण शासन सेवेत नियुक्त झाल्यावर आठ दिवसांत आत विकल्प कार्यालयास सादर करणे आवश्यक राहिल.

२५. महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्र.चारित्र्य-२११७/प्र.क्र.४८३/२०१७/१६ अ दिनांक २८/०८/२०१७ नुसार संबंधित उमेदवारांनी नियुक्तीनंतर सहा महिन्याच्या आत पोलिसांकडील चारित्र्य पडताळणी केले असलेबाबतचा अनुकूल अहवाल या कार्यालयास सादर करावा. सदर चारित्र्याबाबतचा अहवाल सहा महिन्यांच्या आत संबंधित कार्यालयाकडून प्राप्त न झाल्यास कोणतीही पूर्व सुचना न देता आपली नियुक्ती संपुष्टात आणण्यात येईल याची नोंद घ्यावी.

२६. नियुक्ती दिलेल्या पदास स्थायीत्व प्रमाणपत्र मिळालेनंतरच आपणास आंतरजिल्हा बदलीकरिता शासन निर्णय दि.२९ सप्टेबर २०११ मधील तरतुदीनुसार व प्रचलित शासन निर्णयानुसार तसा अर्ज प्रशासनाकडे करता येईल.

२७. उमेदवाराने हजर होतांना वय,जन्मतारीख,जात,शैक्षणिक अर्हता,वैधता प्रमाणपत्र इ बाबतचे मुळप्रमाणपत्र संबधित कार्यालयाकडे सादर करावीत.तसेच कार्यालय प्रमुखांनी संबधितांकडुन ती नामनिर्देशनपत्रे भरुन घेऊन मुळसेवापुस्तकात डकविणेत यावीत.

२८. सदर पदावर रजु झालेचे दिनांकापासुन ३ महिन्यांचे आत महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (सेवाप्रवेश) नियम १९६७ मधील नियम १७ आणि शासन निर्णय क्रं.वशिअ-/१२१४/प्र.क्रं.२६/११ दिनांक २.०६.२०१४ नुसार विहित केलेले मत्ता व दायित्व याबाबतचे विवरणपत्र भरुन दयावे.

सदरचा आदेश अहिल्यानगर जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आला असुन त्याचा संकेतांक क्रमांक 20250925060128 असा आहे.

Signed by
Anand Subhashlal Bhandari
Date: 25-09-2025 12:44:57
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रति,

श्री.ओम संजय वामन, रा. आठरे पाटील शाळेच्या पाठीमागे,वडगाव गुप्ता रोड, मुकबधीर शाळे शेजारी, ता.जि. अहिल्यानगर, पिन ४१४००३

प्रत- गट विकास अधिकारी,पंचायत समिती अहिल्यानगर

२/- संबधित अनुकंपा उमेदवार कंत्राटी पध्दतीने ग्रामपंचायत अधिकारी पदावर हजर होण्यास आल्यांनतर आदेशात नमुद केल्याप्रमाणे प्रथम त्यांच्या शैक्षणिक अर्हतेची मुळ प्रमाणपत्रावरुन खात्री करुन हजर करुन घ्यावे. तसेच रुजु अहवाल सामान्य प्रशासन विभाग-२ कडे त्वरीत सादर करावा.

प्रत - १.मुख्य लेखा व वित्त अधिकारी ,जिल्हा परिषद अहिल्यानगर.

२.उपमुख्य कार्यकारी अधिकारी (साप्रवि),जिल्हा परिषद अहिल्यानगर.

स्वाक्षरीत/-
(आनंद भंडारी) भा.प्र.से.
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर